# शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय

१७, डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे -१

दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२५६९६ फॅक्स क्रमांक ०२०२६१२२२१७

ई मेल आय.डी.क्रं dydpune@gmail.com

वेब साईट क्रमांक www.dydepune.com


जा.क्र.उमाशि-२/११ वी प्रवेश/पुवि/२०१४/१६२०३

दिनांक : १६/७/२०१४

1 6 JUL 2014

प्रति

सर्व मुख्याध्यापक/ प्राचार्य
उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालय,
इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०१४-१५

**विषय** : इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश - शैक्षणिक वर्ष २०१४-१५

**संदर्भ** : १) या कार्यालयाचे परिपत्रक क्रं. दिनांक ११ जूलै २०१४
२) दिनांक १५/७/२०१४ रोजी प्राचार्यांची बैठक.

इयत्ता ११ वी प्रवेशाची तिसरी ऑनलाईन प्रवेश फेरी पूर्ण झालेली आहे. या कार्यालयाच्या दिनांक ११ जूलै २०१४ च्या परिपत्रकात कॉलेज स्तरावर ऑफलाईन पध्दतीने प्रवेश करण्याबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. या सूचनांमध्ये खालील मुद्दयांचाही समावेश करण्यात येत आहे.

१. ज्या विद्यार्थ्यांना तीनही ऑनलाईन प्रवेश फेरीमध्ये प्रवेश मिळाला नाही यांच्यासह दिनांक ११ जूलै २०१४ च्या पत्रात नमूद केलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज प्राप्त झाल्यानुसार त्यांची व्यवस्थित रजिस्टरमध्ये नोंद ठेवावी व अर्ज केलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यास पोहोच दयावी.
२. हे प्रवेश अर्ज भरताना विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारचे प्रवेश अर्जासाठी शुल्क आकारु नये.
३. आपल्या कॉलेज मध्ये आलेल्या सर्व विद्यार्थ्यांची प्रवर्ग निहाय यादी तयार करण्यात यावी.
४. प्रवेश अर्ज देताना मूळ कागदपत्रे पाहिल्याशिवाय प्रवेश अर्ज देऊ नयेत.
५. प्रवेश निश्चित केल्यानंतरच मूळ कागदपत्रे घ्यावीत.
६. आलेल्या प्रवेश अर्जानुसार व आरक्षणानुसार रिक्त संख्या लक्षात घेवून गुणवत्ता यादी तयार करण्यात यावी.
७. आपल्याकडे रिक्त असलेल्या जागेनुसार गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांना दिलेल्या वेळापत्रकानुसार व पुस्तकातील नियमावलीनुसार प्रवेश देण्याची कार्यवाही करावी.
८. रिक्त जागांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांचे अर्ज आल्यास त्याची प्रतिक्षा यादी तयार करुन ठेवावी. व दिनांक २४/७/२०१४ रोजी प्रवेशाचे कामकाज संपल्यानंतर सदरची प्रतिक्षायादी जाहीर करावी.
९. काही विद्यार्थी डिप्लोमा किंवा आयटीआय इत्यादी साठी प्रवेश रद्द केल्यास त्या रिक्त जागेवर प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांना गुणानुक्रमे प्रवेश देण्याची कार्यवाही करावी.
१०. कोणत्याही परिस्थितीत गुणवत्ता व आरक्षण डावलण्यात येवून व प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी (इनहाऊस, अल्पसंख्यांक व व्यवस्थापन) घेण्यात येवू नये.
११. वेळापत्रकाप्रमाणे ऑफलाईन प्रवेश पूर्ण झाल्यानंतर ऑफलाईन पद्धतीने कॉलेजस्तरावर किती जागा भरल्या व त्यानंतरही किती जागा शिल्लक राहिल्या याची माहिती विहित नमून्यात दिनांक २६ जूलै २०१४ दुपारी २.०० वाजेपर्यंत **http://pune.fyjc.org.in** वेबसाईटवर **Online** अपलोड करण्यात यावी.

सदरचे परिपत्रक या कार्यालयाच्या **www.dydepune.com** वेबसाईटवर ठेवण्यात आलेले आहे.

(सही) १६/७/१४

(सुमन शिंदे)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.